मुंबई मराठी साहित्य संघ
साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग, मुंबई ४०० ००४
दूरध्वनी : २३८५ ६३०३, २३८७ ६१५८.
नोंदणी क्र. एफ. ३२२
फॅक्स : ९१-२२ २३८४ ०९०८
इ-मेल : sahityasangha@gmail.com
sahityasangha@mtnl.net:in

जा. क्र.                                                    दिनांक 15 SEP 2014

# संघमंदिर अहवाल

कार्यवाह: दिलीप भाटवडेकर
सदस्य: सर्वश्री रोहिदास पांगे, सुभाष भागवत, सुनील मेहेंदळे, दिपक फडके.
निमंत्रित: सर्वश्री सतीशचंद्र म्हात्रे, डॉ. शशांक मुळगावकर.

**पदसिद्ध:** कार्याध्यक्ष-श्रीमती उषा शशिकांत तांबे.
कोषाध्यक्ष-श्रीमती आशा प्रताप मुळगांवकर.
प्रमुखकार्यवाह-डॉ.राजाराम अमृत भालेराव.

२०१३ ते२०१८ साठीच्या नियामक मंडळाच्या निवडणुकी नंतर दिनांक ११.०९.२०१३ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत समस्त पदाधिकारी व समित्यांची नेमणूक सभेनी केली.संघ मंदिर व्यवस्था समितीचे सदस्य वरील प्रमाणे असतील.
कार्यभार हाती घेतल्यावर समिती समोर तातडीच्या कामांत खालीप्रमाणे कामे आहेत.

- ❖ संघ इमारतीच्या उत्तरेकडील संपूर्ण भिंतीचा नवीन गिलावा करणे.
- ❖ त्याच भिंतीवर असलेल्या सगळ्या पाण्याच्या व सांडपाण्याच्या नलिकांचे नूतनीकरण करणे.

वरील दोन ही कामे २०१३-२०१४ या वित्तवर्षांत पूर्ण करण्यात आली आहेत व उर्वरीत कामे पुढील वित्तवर्षांत पूर्ण करण्याचा प्रतत्न असेल.

- ❖ रंगमंचावरील छतातून पावसाळ्यांत होणाऱ्या पाण्याच्या गळतीची दुरुस्ती करणे.
- ❖ संघ मंदिर इमारतीत, विशेषत: नाट्यगृहांत क्लोज सर्किट टिव्ही यंत्रणा बसवणे.
- ❖ इमारतीतील अंतर्गत डागडुजी करून घेणे.
- ❖ संघ इमारतीच्या दक्षिणेकडील संपूर्ण भिंतीचा नवीन गिलावा करणे, त्याचप्रमाणे नाट्यगृहाच्या रंगभूषा व वेशभूषा कक्षांच्या भिंतींचा आतीलबाजूनी गिलावा, रंगकाम व खिडक्यांची दुरुस्ती/बदल करणे.
- ❖ संघ मंदिर सुरक्षेसाठी इमारतीत क्लोजसर्किट टी.व्ही प्रणाली बसवून ती कार्यान्वित करणे. सदर प्रणाली बसविण्यासंदर्भात पोलिस खात्याकडून गेली दोन वर्षे संघ मंदिराला सूचना होत आहेत.

२०१३-१४ (सप्टेंबर २०१३ ते मार्च २०१४)या वित्तवर्षांत समितीच्या एकूण तीन सभा झाल्या, त्या पोढील प्रमाणे-

पहिली सभा: १६ ऑगस्ट २०१३. दुसरी सभा: ९ डिसेंबर २०१३ व तिसरी सभा: २६ फेब्रुवारी २०१४

याच बरोबर संघ मंदिराच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने प्रयत्नाचा भाग म्हणून, संघ इमारतीत आदमासे ६० चौरस फूट जागेत,बँक ऑफ इंडियाबरोबर करार करून, एटीएम् चालू करण्यांत समितीला यश आले आहे.या द्वारे संघाच्या मिळकतीत जानेवारी २०१४ पासून मासिक रु.१५,०००/- इतकी भर पडली आहे.

थिएअटर प्रोफेशनलस् या कंपनीच्या ड्रामा स्कूल या नाट्य विषयक प्रशिक्षण वर्गासाठी संघ मंदिराच्या पाचव्या मजल्यावरील पुरंदरे सभागृहाची जागा लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर ३३ महिन्याच्या करारावी देण्यात येणार अहे. या द्वारे संघाला मासिक रु.५०,०००/-इतके उत्पन्न मिळत आहे.

याशिवात संघ इमारतीच्या छतावर मोबाईल कंपनीच्या मानव रहित ट्रान्समिशन टॉवरसाठी जागा देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यात समितीला यश आल्यास मासिक रु.१,००,०००/- पर्यंत उत्पन्न संघाला मिळू शकेल.

या समिती कार्यात समस्त समिती सदस्यांचे भरीव योगदान मिळत असते. विशेषत: इमारत दुरुस्तीच्या कामात समिती सदस्य श्री दीपक फडके यांचे बहुमोला सहाय्य समितीला लाभले.संपूर्ण इमारत दुरुस्तीचे काम श्री फडके यांच्या देखरेखीखाली व अधिपत्याखाली पूर्ण झाले आहे.

नाट्यगृहाच्या वातानुकूलन यंत्रणेच्या संदर्भात श्री नंदकुमार भाटकर यांचे बहुमोल व विनामुल्य सहाय्य आणि मार्गदर्शन समितीला लाभले.

नाट्यशाखा कार्यवाह व संघ मंदिर समिती सदस्य श्री. सुभाष भागवत यांचेही बहुमोल सहाय्य समितीच्या सर्व कामांत मिळते.

त्याचप्रमाणे श्री सतीशचंद्र म्हात्रे यांचे बहुमोल मार्गदर्शनही समितीला वेळोवेळी समितीच्या कामात मिळते.

या समस्तांच्या बहुमोल मदतीची कृतज्ञतापूर्वक नोंद घणे उचित ठरेल.

मुंबई मराठी साहित्य संघ

दिलीप क. आठवडेकर

कार्यवाह संघ मंदिर